**राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (Non-Intensive NRLM) राज्यात प्रभावीपणे राबविण्याकरिता जिल्हा व तालुका कक्ष निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१३९/योजना ३
२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१, दिनांक : ३० जून, २०१३.

वाचा :- १) शासन निर्णय क्र.मजिअ-२०१३/प्र.क्र.३६/योजना ३, दिनांक २० मार्च, २०१३.
२) शासन पत्र क्र. जिग्राप्र-२००७/प्र.क्र.२५/यो-५, दिनांक ३० मार्च, २००७.

**शासन परिपत्रक :-**

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान Non-Intensive पध्दतीने राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा व तालुका कक्ष निर्माण करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने दि.२० मार्च, २०१३ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्यामध्ये जिल्हा स्तरावर कार्यतत्पर व उत्साही सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांची जिल्हा अभियान समन्वयक म्हणून निवड करावी. ते दैनंदिन समन्वयाचे काम करतील. वरील पदांमधील जी पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत ती पदे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी एकत्रित मानधनावर विहीत पध्दतीचा अवलंब करुन भरण्यात यावीत. **"सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांच्या कराराची मुदत संपल्यानंतर अभियानामध्ये जिल्हा समन्वयक या पदावर कत्राटी पध्दतीने स्वतंत्र जाहिरात काढून नेमणूक करण्यात यावी.** यासाठी आवश्यक असलेली शैक्षणिकअर्हता, मानधन व भरती करण्याची कार्यपध्दती याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील असे नमूद करण्यात आले आहे."

२. या संदर्भात कार्यवाही करताना सध्या कार्यरत असलेल्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती त्यांचा कराराचा कालावधी संपला असेल त्या पदावर पुन्हा करार पध्दतीद्वारे नियुक्ती चालू ठेवण्यापूर्वी या अधिकाऱ्यानी/कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचे मुल्यमापन करावे. हे अधिकारी/कर्मचारी कार्यक्षम वाटत नसल्यास त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात याव्यात. या अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या केलेल्या कामाचे मुल्यमापन करुन जर हे अधिकारी अभियानासाठी उपयुक्त वाटत असतील अशी जिल्हा अभियान संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांची खात्री झाली असेल तरच अशा अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना पुढील ६

महिन्यांकरिता किंवा जास्तीत दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंत नियुक्ती करण्यात यावी. या वाढीव कालावधीतील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाचे उद्दिष्ट निश्चित करुन पुढील काळात त्यांचे मुल्यमापन करावे. यासाठी मुल्यमापनाचे निकष मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे निश्चित करतील. या अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाचे मुल्यमापन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक यांनी केल्यानंतर या मुल्यमापनाच्या आधारे अभियानाच्यादृष्टीने उपयुक्तता तपासुन दिनांक ३१ मार्च २०१४ नंतर त्यांच्या नियुक्ती संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या सल्लाने जिल्हा अभियान प्रमुख तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निर्णय घ्यावा. जोपर्यंत Non-Intensive NRLM कार्यक्रम जिल्ह्यात अस्तित्वात असेल तोपर्यंत ६-६ महिन्याच्या कालावधी करिता उद्दिष्टे निश्चित करुन त्याचे वरीलप्रमाणे मुल्यमापन करुन करारपध्दतीवरील नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(अनिल काळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा.मंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
७) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन, वित्त, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, महिला व बाल कल्याण, सहकार, कृषि व पदुम, उद्योग,उर्जा व कामगार, शालेय शिक्षण,उच्च व तंत्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर (५ प्रतींसह)
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर (५ प्रतींसह)
१०) विभागीय आयुक्त, (सर्व)
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सी.बी.डी,बेलापूर, नवी मूंबई -४००६१४
१२) जिल्हाधिकारी (सर्व)
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१४) उप आयुक्त (आस्थापना/विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय(सर्व)
१५) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१६) गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१७) निवडनस्ती